# नागरिकांची सनद

**संदर्भ :–** मा. प्रधान सचिव, (प्र.सु.व र.व का), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे पत्र – अ.शा.प.क.नासद 1518/प्रकरण 63/18–अ, दिनांक 4 फेब्रुवारी, 2021.

**व्याख्या :** महाराष्ट्र शासन, राजपत्र असाधारण मे – 2012, 2006 यातील प्रकरण क.1 प्रारंभिक यातील व्याख्या या शिर्षकानुसार परिच्छेद क.2 मध्ये नागरिकांची सनद याचा अर्थ कार्यालयाने किंवा विभागाने दिलेल्या सुविधा किंवा सेवा यांची सूची, तसेच अशा सुविधा किंवा सेवा सर्वसामान्य जनतेला पुरविण्यासाठी असलेली कालमर्यादा असा आहे.

---

उपरोक्त संदर्भीय पत्र आणि नमूद व्याख्येच्या अनुषंगाने न्यायीक जिल्हा, उस्मानाबाद अंतर्गत उस्मानाबाद मुख्यालयी तसेच जिल्हयातील तालुका स्तरावर सध्या कार्यरत असणाऱ्या सर्व न्यायालयीन आस्थापनांची माहिती जिल्हा व सत्र न्यायालय, उस्मानाबाद या आस्थापनेच्या संकेतस्थळावर 'नागरिकांची सनद' असा विषय नमूद करुन याव्दारे खालीलप्रमाणे प्रसिध्द केली जात आहे.

## (अ) उस्मानाबाद येथील सार्वजनिक प्राधिकरणाच्या कामाचा व कर्तव्याचा तपशील.

1) सार्वजनिक प्राधिकरणाचे नांव : **जिल्हा व सत्र न्यायालय, उस्मानाबाद जिल्हा उस्मानाबाद.**

2) पत्ता : **मेन रोड,उस्मानाबाद**

3) कार्यालय प्रमुख : **प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,उस्मानाबाद**

4) शासकीय विभागाचे नाव : **विधी व न्याय विभाग**

5) कोणत्या खात्याच्या अंतर्गत हे कार्यालय: **विधी व न्याय विभाग,मंत्रालय,मुंबई–400 032**

6) कार्यक्षेत्र : **उस्मानाबाद जिल्हा**

7) दूरध्वनी कमांक : **(02472) 224733**

8) ई–मेल : **mahosmdc@mhstate.nic.in**

9) कार्यालयाची वेळ : **सकाळी 10:30 ते सायंकाळी 6:00**

**साप्ताहिक सुट्टी** :

प्रत्येक रविवार तसेच प्रत्येक महिन्याचा दुसरा व चौथा शनिवार या दिवशी कार्यालयास साप्ताहिक सुट्टी असते. सुट्टीचे कालावधीमध्ये राष्ट्रीय लोकन्यायालय, विधी साक्षरता शिबीर व न्यायीक अधिकारी, कर्मचारी यांचेकरीता कार्यशाळा/प्रशिक्षण असे कार्यक्रम राबविले जातात.

**ब)** न्यायीक जिल्हा उस्मानाबाद या जिल्हांतर्गत उस्मानाबाद मुख्यालयी खालील संवर्गनिहाय न्यायालयांचे कामकाज चालते.

| अ.क्र. | न्यायालयाचे नाव | संख्या |
|---|---|---|
| 1 | प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश | 1 |
| 2 | जिल्हा न्यायाधीश आणि अतिरिक्त सत्र न्यायाधीश **(महिलांवरील अत्याचार कायद्यांकरिता विशेष न्यायालय)** | 3 |
| 3 | तदर्थ जिल्हा न्यायालय आणि सहाय्यक सत्र न्यायाधीश | 1 |
| 4 | अतिरिक्त सह जिल्हा न्यायाधीश व अति. सत्र न्यायाधीश (POCSO) | 1 |
| 5 | मुख्य न्यायदंडाधिकारी | 1 |
| 6 | दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर | 1 |
| 7 | सह दिवाणी न्यायाधीश, व.स्तर व अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी | 5 |
| 8 | .सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण कार्यालय | 1 |
| 9 | सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर व न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी | 5 |
| 10 | .अतिरिक्त सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर व न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी | 6 |

उस्मानाबाद येथील जिल्हा व सत्र न्यायालयातील अपीलीय व सत्र विभागाच्या कामकाजाची कार्यकक्षा व न्यायीक अधिकार क्षेत्र उस्मानाबाद, तुळजापूर, कळंब या महसूली तालुक्याकरीता आहे.

उस्मानाबाद येथील दिवाणी न्यायालय, व.स्तर या न्यायालयांची कार्यकक्षा व न्यायीक अधिकार क्षेत्र उस्मानाबाद, तुळजापूर, कळंब, या महसूली तालुक्याकरीता आहे.

उस्मानाबाद येथील दिवाणी न्यायाधीश, क.स्तर व न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी यांचे न्यायालयांची कार्यकक्षा व न्यायीक अधिकार क्षेत्र उस्मानाबाद शहर तसेच उस्मानाबाद महसूली तालुक्याकरीता आहे.

## ब) उमरगा सत्र विभाग :–

उमरगा येथे विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील अधिसूचना क्रमांक A-1201/2004 Dated 26th August, 2004 नूसार दिनांक 12 सप्टेंबर, 2004 पासून उमरगा तालुक्यासाठी स्वतंत्र सत्र विभाग स्थापन करण्यांत आलेला आहे.

सध्या **उमरगा आणि लोहारा** येथे खालीलप्रमाणे न्यायालये कार्यरत आहेत.

| अ.कं. | न्यायालयाचे नाव | संख्या |
|---|---|---|
| 1 | जिल्हा न्यायाधीश–1 व अतिरिक्त सत्र न्यायाधीश,**उमरगा** | 1 |
| 2 | दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर,**उमरगा** | 2 |
| 3 | सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर व न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी, **उमरगा** | 3 |
| 4 | दिवाणी न्यायाधीश, क.स्तर व न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी, **लोहारा** | 1 |

उमरगा येथील जिल्हा व सत्र न्यायालयातील अपीलीय व सत्र विभागाच्या कामकाजाची कार्यकक्षा व न्यायीक अधिकार क्षेत्र **उमरगा व लोहारा** या महसूली तालुक्याकरीता आहे.

उमरगा येथील दिवाणी न्यायालय, व.स्तर या न्यायालयांची कार्यकक्षा व न्यायीक अधिकार क्षेत्र उमरगा व लोहारा या महसूली तालुक्याकरीता आहे.

उमरगा येथील दिवाणी न्यायाधीश, क.स्तर व न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी यांचे न्यायालयांची कार्यकक्षा व न्यायीक अधिकार क्षेत्र उमरगा शहर तसेच उमरगा महसूली तालुक्याकरीता आहे.

लोहारा येथील दिवाणी न्यायाधीश, क.स्तर व न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी यांचे न्यायालयांची कार्यकक्षा व न्यायीक अधिकार क्षेत्र लोहारा शहर तसेच लोहारा महसूली तालुक्याकरीता आहे.

## क) भूम सत्र विभाग :–

भूम येथे विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांची अधिसूचना कमांक CRC-2314/C.R. No. 37/D-12 Dated 7th March, 2014 नूसार भूम तालुक्याकरीता एक सत्र विभाग **दिनांक 16 मार्च, 2014** रोजी स्थापन करणेत आला असुन तेथील अपर जिल्हा व सत्र न्यायालयाची कार्यकक्षा व न्यायीक अधिकार क्षेत्र भूम, परंडा व वाशी तालुक्यापुरती मर्यादित आहे.

आज दिनांकास **भूम ,परंडा आणि वाशी** येथे खालीलप्रमाणे न्यायालये कार्यरत आहेत.

| अ.नं. | न्यायालयाचे नाव | संख्या |
|---|---|---|
| 1 | जिल्हा न्यायाधीश–1 व अतिरिक्त सत्र न्यायाधीश, **भूम** | 1 |
| 2 | जिल्हा न्यायाधीश–2 व अतिरिक्त सत्र न्यायाधीश, **भूम** | 1 |
| 3 | तदर्थ जिल्हा न्यायाधीश–1 व अतिरिक्त सत्र न्यायाधीश, **भूम** | 1 |
| 4 | दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, **भूम** | 2 |
| 5 | सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर व न्यायदंडाधिकारी प्र.श्रे., **भूम** | 2 |
| 6 | दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, **परंडा** | 2 |
| 7 | सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर व न्यायदंडाधिकारी प्र.श्रे., **परंडा** | 3 |
| 8 | दिवाणी न्यायाधीश, क.स्तर व न्यायदंडाधिकारी प्र.श्रे., **वाशी** | 1 |

भूम येथील जिल्हा व सत्र न्यायालयातील अपीलीय व सत्र विभागाच्या कामकाजाची कार्यकक्षा व न्यायीक अधिकार क्षेत्र भूम, परंडा व वाशी या महसूली तालुक्याकरीता आहे.

भूम येथील दिवाणी न्यायालय, व.स्तर या न्यायालयांची कार्यकक्षा व न्यायीक अधिकार क्षेत्र भूम व वाशी या महसूली तालुक्याकरीता आहे.

भूम येथील सह दिवाणी न्यायाधीश,क.स्तर व न्यायदंडाधिकारी,प्रथम श्रेणी यांचे न्यायालयांची कार्यकक्षा व न्यायीक अधिकार क्षेत्र भूम शहर तसेच भूम महसूली तालुक्याकरीता आहे.

परंडा येथील दिवाणी न्यायालय, व.स्तर या न्यायालयांची कार्यकक्षा व न्यायीक अधिकार क्षेत्र परंडा शहर व परंडा या महसूली तालुक्याकरीता आहे.

परंडा येथील सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर व न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी यांचे न्यायालयांची कार्यकक्षा व न्यायीक अधिकार क्षेत्र परंडा शहर तसेच परंडा महसूली तालुक्याकरीता आहे.

वाशी येथील दिवाणी न्यायाधीश, क.स्तर व न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी यांचे न्यायालयांची कार्यकक्षा व न्यायीक अधिकार क्षेत्र वाशी शहर तसेच वाशी महसूली तालुक्याकरीता आहे.

ड)**तुळजापूर आणि कळंब** या तालुक्यांच्या ठिकाणी खालीलप्रमाणे न्यायालये कार्यरत आहेत.

| अ. नं. | तालुक्याचे ठिकाण | न्यायालयाचे नाव | संख्या |
|---|---|---|---|
| 1 | **तुळजापूर** | दिवाणी न्यायाधीश, क.स्तर व न्यायदंडाधिकारी प्र.श्रे.,**तुळजापूर** | **3** |
| 2 | **कळंब** | दिवाणी न्यायाधीश, क.स्तर व न्यायदंडाधिकारी प्र.श्रे.,**कळंब** | **3** |

तुळजापूर येथील दिवाणी न्यायाधीश, क.स्तर व न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी यांचे न्यायालयांची कार्यकक्षा व न्यायीक अधिकार क्षेत्र तुळजापूर शहर तसेच तुळजापूर महसूली तालुक्याकरीता आहे.

कळंब येथील दिवाणी न्यायाधीश, क.स्तर व न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी यांचे न्यायालयांची कार्यकक्षा व न्यायीक अधिकार क्षेत्र कळंब शहर तसेच कळंब महसूली तालुक्याकरीता आहे.

उस्मानाबाद जिल्हयातील वर नमूद सर्व न्यायालये ही दिवाणी प्रकिया संहिता, फौजदारी प्रकिया संहिता व इतर कायदे तसेच मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी ठरवून दिलेल्या दिवाणी नियमावली व फौजदारी नियमावली नुसार त्यांच्या न्यायालयास प्राप्त असलेल्या त्या–त्या महसूली कार्यक्षेत्रानुसार तसेच त्यांना प्राप्त वित्तीय अधिकारानुसार न्यायदानाचे कामकाज करतात.

- **दिवाणी विभागाकडील न्यायालयास प्राप्त वित्तीय अधिकार :**

| अ.क. | संवर्ग | वित्तीय अधिकार |
|---|---|---|
| 1) | जिल्हा न्यायाधीश | **दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर यांचे न्यायनिर्णयाविरुध्दची रुपये एक कोटी पर्यंतची सर्व अपिले, तसेच दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,यांचे न्यायनिर्णयांविरुध्दची सर्व अपिले.** |
| 2) | दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर | **रुपये 5,00,000/– (रुपये पाच लाख) च्या पुढील मूल्यांकनाचे सर्व दावे** |
| 3) | दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर | **रुपये 5,00,000/– (रुपये पाच लाख) पर्यंत** |

- **फौजदारी विभाग –**

  फौजदारी प्रकिया संहिता यातील तरतुदीनुसार सत्र नयायालयात सत्र खटल्यांची सुनावणी घेतली जाते. तसेच मुख्य न्यायदंडाधिकारी व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग यांचे न्यायालयामध्ये इतर फौजदारी प्रकरणांमधील सुनावणी घेतली जाते.

- **बाल न्याय मंडळ :**

  उस्मानाबाद जिल्हयाच्या न्यायीक अधिकारा अंतर्गत उस्मानाबाद येथे बाल गुन्हेगारी संबंधातील कलम 4 अंतर्गत येणारे खटले चालविण्यासाठी बालक न्यायीक संस्था कार्यरत आहे. दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर आणि प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी यांची मुख्य न्यायदंडाधिकारी म्हणून नेमणूक करण्यात येते. प्रत्येक शुकवार आणि कामकाजाचे शनिवार रोजी कामकाज चालविले जातात.

## नागरिकांकरीता उपलब्ध सोयी–सुविधा

## जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, उस्मानाबाद

जिल्हा व सत्र न्यायालय, उस्मानाबाद आवारामध्ये पूर्व–उत्तर दिशेला जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, उस्मानाबाद या कार्यालयाची इमारत असून 2015 पासून त्या ठिकाणी वैकल्पिक वाद निवारणासाठीचे कामकाज चालते.

| | | |
|---|---|---|
| आस्थापनेचे नांव | – | **जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, उस्मानाबाद** |
| पत्ता | – | **जिल्हा न्यायालय परिसर, उस्मानाबाद** |
| दूरध्वनी कमांक | – | **(02472) 225424** |
| ईमेल आयडी | – | **dlsaosd@gmail.com** |

- **उद्देश**: विधी सेवा प्राधिकरणाचे **'न्याय सर्वांसाठी'** हे घोषवाक्य आहे. राज्य घटनेच्या अनुच्छेद 14 नुसार सर्व नागरिकांना समान संधी दिलेली आहे. त्याचप्रमाणे अनुच्छेद 39 नुसार समाजातील दुर्बल घटकांना मोफत कायदे विषयक सहाय्य देण्याची राज्य शासनाची जबाबदारी आहे. तमाम नागरिकांच्या विशेषतः दुर्बल व गोरगरिबांच्या हक्कांचे व हिताचे रक्षण व जोपासना करण्यासाठी विधी सेवा प्राधिकरणाची स्थापना झालेली आहे.

- **विधी सेवा प्राधिकरणाचे कार्य –**

  1) न्यायालय/न्यायाधिकरण/प्राधिकरण समक्ष कोणतेही प्रकरण किंवा इतर कायदेशीर कार्यवाही चालविण्याच्या प्रकियेत समुपदेशनाच्या स्वरुपात मोफत विधी सहाय्य पुरविणे आणि मोफत विधी सेवा पुरविणे.
  2) खर्च व वेळेची बचत करुन तसेच तांत्रिक बाबींचा अडसर टाळून जलदगतीने न्याय मिळवून देण्याच्या हमी करीता, प्रलंबित प्रकरणांमध्ये तसेच असे वाद जे न्यायालयासमक्ष आणले गेले नाहीत अशा वादांमध्ये सुध्दा समझोता करीता लोक न्यायालय आयोजित करणे.
  3) वैवाहिक वाद **मध्यस्थ आणि समेट** पध्दतीने मिटविणे.
  4) वादातील पक्षकार आणि सर्व सामान्य जनतेत, सामाजिक व विधी दृष्टया महत्वाच्या मुद्दयांवर कायदेशीर बाबी संबंधी जागरुकता निर्माण करणे.
  5) कैद्यांना आणि न्यायाधिन बंदींना मोफत विधी सेवा प्रदान करणे.

**<u>आस्थापने अंतर्गत येणारी न्यायलये :-</u>**

सर्व तालुका विधी सेवा समिती, जिल्हा उस्मानाबाद

**<u>कार्यालयीन कामकाजाची माहिती :-</u>**

समाजातील दुर्बल घटकांना, मागासवर्गीय, स्त्रिया, मुले व इतरांना विधी सेवा व सल्ला पुरविणे, लोकन्यायालयाचे आयोजन करणे.

**<u>विधी सेवा प्राधिकरणाच्या कार्यालयाची रचना –</u>**

जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे कार्यालय हे प्रत्येक जिल्हा स्तरावर कार्यरत असून त्या जिल्हा न्यायालयाचे प्रमुख जिल्हा न्यायाधीश हे त्याचे अध्यक्ष आणि दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर या संवर्गातील एक न्यायीक अधिकारी हे सचिव असतात. तालुका पातळीवर तालुका विधी सेवा समितीची स्थापना करण्यात आली असून तेथे कार्यरत असणारे वरिष्ठ न्यायाधीश हे त्या समितीचे अध्यक्ष असतात.

- **<u>विधी सेवेस पात्र व्यक्ती –</u>**

1. अनुसुचित जाती व जमातीचे व्यक्ती
2. अवैध मानवी व्यापारातील बळी किंवा भिकारी
3. महिला व बालके
4. दिव्यांग व्यक्ती म्हणजेच अशा व्यक्ती ज्या अंधत्व, कुष्ठरोगी, एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाण्यात असमर्थता, बहिरेपण, मानसिक असमर्थता यांनी ग्रस्त आहेत.
5. सार्वत्रिक आपत्ती, जातीय हिंसाचार, जातीय अत्याचार, पूर, दुष्काळी, भूकंप किंवा औद्योगिक आपत्तीचे बळी.
6. औद्योगिक कामगार
7. अन्विक्षाधीन, न्यायालयीन कोठडीत असलेल्या व्यक्ती ज्यामध्ये सुरक्षागृहातील किशोरवयीन अपराधी, म्हणजेच 18 वर्षापर्यंत वय असलेल्या व्यक्तींचा किंवा मनोरुग्णालयातील अथवा शुश्रूषालयातील मानसिक रुग्ण यांचा समावेश.
8. वार्षिक उत्पन्न रुपये दोन लक्ष पेक्षा जास्त नाही अशा व्यक्ती.

**<u>विधी सहाय्य प्राप्त करण्यासाठी कशाप्रकारे अर्ज करावा ?</u>**

1. संक्षिप्त स्वरूपात तक्रार किंवा सहाय्यता प्राप्त करण्याचे कारण नमूद करून एक लिखीत स्वरूपात अर्ज दाखल करावा.
2. जर अर्जदार अशिक्षित असेल किंवा लिहिण्याच्या स्थितीत नसेल तर, विधी सेवा प्राधिकरण/समितीचे सदस्य सचिव किंवा अधिकारी त्यांचे तोंडी निवेदन नोंदवून घेतील आणि नोंदविलेल्या निवेदनावर त्याची सही/अंगठयाचा ठसा घेतील आणि असे निवेदन अशा व्यक्तीचा अर्ज समजण्यात येईल.
3. अर्जदारास विधी सेवा प्राधिकरण/समितीकडे विनाशुल्क उपलब्ध असलेल्या एका विहित नमुन्यात शपथपत्र निष्पादित करून द्यावे लागेल, ज्यायोगे अर्जदाराची विधी सहाय्य प्राप्त करण्यासंबंधी निकष तपासून घेता येईल.
4. विधी सेवा प्राधिकरण/समितीचे सदस्य सचिव अर्जदाराची त्याने शपथपत्रामध्ये सांगितलेल्या तथ्यांची पडताळणी करण्यासाठी तपासणीसुध्दा करू शकतात.

## कोणत्या स्वरुपाची विधी सहाय्यता पुरविली जाते ?

1. कोणत्याही न्यायालयीन कार्यवाहीशी संबंधित देय किंवा झालेला सर्व खर्च
2. कोणत्याही कायदेशीर कार्यवाहीमध्ये मसुदा लेखन करणे, दस्तऐवज तयार करणे आणि कायदेशीर कार्यवाहीमध्ये विधी व्यवसायीने प्रतिनिधीत्व करणे यासाठीचा खर्च.
3. कायदेशीर कार्यवाहीमध्ये आदेशांच्या, न्यायनिर्णयांच्या प्रती/प्रमाणित प्रती मिळविण्यासाठी लागणारा खर्च व इतर किरकोळ खर्च
4. कायदेशीर कार्यवाहीमध्ये झालेला इतर खर्च, उदा. खटल्याचे कागद–पुस्तक तयार करणे ( ज्यामध्ये कागद, छपाई आणि कागदपत्रांचे भाषांतर सामील आहे ) आणि त्यास अनुषंगिक इतर खर्च.

## विधी सेवा प्राधिकरणातर्फे राबविण्यात येणारे उपक्रम :

1) विधी साक्षरता शिबिरे भरविणे, चर्चासत्र व कार्यशाळा आयोजित करणे
2) लोकन्यायालय भरविणे.
3) नुकसान भरपाई योजनांची अंमलबजावणी

विधी साक्षरता शिबिरे भरविणे, चर्चासत्र व कार्यशाळा आयोजित करणे , जनतेस त्यांचे हक्कासंबंधीची जाणीव करून देण्यासाठी व त्यांना कायदेविषयक साक्षर करण्यासाठी शिबिरे, चर्चासत्र व कार्यशाळेचे आयोजन केले जाते. प्रामुख्याने ग्रामीण व दुर्गम. झोपडपट्टी, कामगार वसाहत, शैक्षणिक संस्था वगैरे ठिकाणी भरविण्यात येतात. अन्याय निवारणाबाबत दाद मागण्यासाठी मार्गदर्शन केले जाते.

## लोकन्यायालय भरविणे :

### लोक न्यायालय म्हणजे काय ?

लोकन्यायालयाचे आयोजन विधी सेवा प्राधिकरणांमार्फत केले जाते. 'लोकन्यायालय' म्हणजे या गाव पंचायतीचे आधुनिक रूप. जेथे कायदा जाणणाऱ्या नि:पक्ष पाती लोकांचे न्यायमंडळ त्यांच्यापुढे येणाऱ्या प्रकरणांमध्ये सामंजस्याने न्याय्य तडजोड घडवितात. प्रत्येक जिल्हयाच्या व तालुक्याच्या ठिकाणी राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण व महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण यांचे आदेशानुसार लोकन्यायालयाचे आयोजन केले जाते.

## लोकन्यायालयाबाबत माहिती कोठे मिळेल ?

जिल्हा व तालुका न्यायालयांमध्ये होणाऱ्या लोकन्यायालयांची माहिती त्या त्या जिल्हा व तालुका न्यायालयामध्ये कार्यरत असलेल्या जिल्हा विधी सेवाप्राधिकरण व तालुका विधी सेवा समित्यांच्या कार्यालयांकडून मिळेल.

## नुकसान भरपाई योजनांची अंमलबजावणी

## पिडीतेस नुकसान भरपाई विषयीच्या योजना :

कलम 357 फौजदारी प्रक्रिया संहिता नुसार न्यायालयामध्ये खटला चालू असताना आरोपीस शिक्षा देताना फिर्यादी किंवा पिडीतेस नुकसान भरपाई देण्याची तरतूद फौजदारी प्रक्रिया संहितेत पूर्वीपासून आहे परंतु आरोपी निर्दोष मुक्त झाला, फरार झाला, मयत झाला तर अशा परिस्थितीमध्ये पिडीतेचे नुकसान होवूनसुध्दा नुकसान भरपाई मिळणे कामी तरतूद कायद्य मध्ये नव्हती. त्यानंतर सन 2009 साली कलम 357 अ नुसार फौजदारी प्रक्रिया संहितेमध्ये पिडीतास नुकसान भरपाई योजना याची तरतुद केलेली आहे. त्यानुसार राज्य सरकारने केंद्र सरकारशी सल्लामसलत करुन पिडीत किंवा वारसांना नुकसान भरपाई मिळावी व त्यांचे पुर्नवसन व्हावे याकरिता योजना तयार करण्याची तरतूद करण्यात आली. सदर दुरुस्तीनंतर पिडीत व वारसांना नुकसान भरपाई मिळण्याच्या दृष्टीने तीन योजना कार्यरत आहेत त्या खालीलप्रमाणे

अ) **मनोधैर्य योजना.**

ब) **पिडीतेस नुकसान भरपाई योजना.**

क) **नालसा लैंगिक अत्याचार/इतर गुन्हयातील बळी पडलेल्या/ त्यातुन बचावलेल्या महिलांकरिता नुकसान भरपाई योजना 2018**

## मध्यस्थी म्हणजे काय ?

मध्यस्थी म्हणजे हस्तक्षेप प्रकियेचा एक भाग, ज्यात एक तटस्थ व्यक्ती म्हणजे मध्यस्थ, जो विवादक पक्षकारांमध्ये असणारा तंटा परस्पर संमतीने सोडविण्याकरिता मदत करतो. मध्यस्थी, ही गोपनीय, ऐच्छिक परस्पर सहभाग असणारी अशी प्रकिया तर पक्षकारांनी तंटा समोपचाराने सोडविता यावा याकरिता अनुकुल परिस्थिती निर्माण करतो.

## मध्यस्थीकरीता अर्ज कसा करता येईल ?

दिवाणी प्रक्रिया संहितेच्या कलम 89 मध्ये नमुद प्रमाणे जर एखादया प्रकरणात सामोपचाराने तंटा मिटविण्याचा जराही वाव असल्यास पिठासन अधिकारी ते प्रकरण मध्यस्थीकरीता मध्यस्थी केंद्राकडे संदर्भित करु शकतील. दोन्हीही पक्षकार समझोता करण्यास कबूल नसतील, परंतू त्यांची मध्यस्थीच्या माध्यमाने समेटाची शक्यता शोधण्याची प्रामाणिक इच्छा असल्यास अशावेळी सुध्दा ते प्रकरण मध्यस्थीकडे संदर्भित करणे योग्य आहे. मध्यस्थी प्रकियेसाठीची कालमर्यादा 60 दिवस असून ती पक्षकाराच्या किंवा मध्यस्थांच्या विनंतीवरुन पिठासन अधिकारी यांचेकडून 90 दिवसापर्यंत पाठविता येते.

**जिल्हा विधी सेवा प्राधिकरण,उस्मानाबाद या विभागाने दिलेल्या सुविधा किंवा सेवा यांची सूची –**

या कार्यालयात व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे विविध प्रकारच्या बैठकीचे आयोजन करता येते. जागोजागी भित्तीपत्रक लावून सर्वसामान्य लोकांमध्ये जनजागृती निर्माण करून त्याची माहिती देण्याचा प्रयत्न केला जातो. या कार्यालयात बसण्यासाठी जागा, पिण्याच्या पाण्याची सुविधा व प्रसाधनगृहे ही उपलब्ध केलेली आहेत.

## माहितीचा अधिकार विभाग

अ. प्राधिकाराचे नांव : **जिल्हा व सत्र न्यायालय, उस्मानाबाद**

कार्यक्षेत्र : उस्मानाबाद जिल्हा

माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या अंमलबजावणीकरिता मा.उच्च न्यायालय, मुंबई यांची अधिसूचने अन्वये महाराष्ट्रातील जिल्हा न्यायालयाकरीता माहितीचा अधिकार (सुधारीत) नियम–2009 अन्वये पदनिर्देशित करण्यात आलेल्या सहा.जनमाहिती अधिकारी, जनमाहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांची माहिती.

| विभाग / कार्यालयाचे नाव | जनमाहिती अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी |
|---|---|---|
| जिल्हा व सत्र न्यायालय,**उस्मानाबाद** | प्रबंधक, जिल्हा न्यायालय, उस्मानाबाद. | जिल्हा न्यायाधीश–1, उस्मानाबाद |

ब. प्राधिकाराचे नांव : **जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, उस्मानाबाद**

1. कार्यक्षेत्र : उस्मानाबाद जिल्हा.

2. माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या अंमलबजावणीकरिता पदनिर्देशित करण्यात आलेल्या सहा. जनमाहिती अधिकारी, जनमाहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांची माहिती

| अ. क. | विभाग / कार्यालयाचे नाव | सहा. जनमाहिती अधिकारी | जनमाहिती अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|
| 1) | जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, कार्यालय उस्मानाबाद | अधिक्षक, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, उस्मानाबाद | सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, उस्मानाबाद | अध्यक्ष, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, उस्मानाबाद |
| 2) | तालुका विधी सेवा समिती | वरिष्ठ लिपीक, तालुका विधी सेवा समिती | अध्यक्ष, तालुका विधी सेवा समिती | अध्यक्ष, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, उस्मानाबाद |

➢ **नक्कल विभाग**

उस्मानाबाद जिल्हा न्यायालयात जिल्हा न्यायालयातील मध्यवर्ती अभिलेख कार्यालय तसेच जिल्हयातील प्रत्येक आस्थापनेमध्ये नक्कल विभाग हा स्वतंत्रपणे कार्यरत असून न्यायालयीन प्रकरणातील साक्षांकित नकला जर पक्षकारांना आवश्यक असतील तर नियमास अनुसरून रितसर अर्ज सादर करून व त्याचे योग्य ते शुल्क अदा केल्यास, पक्षकारांना न्यायालयीन प्रकरणातील कागदपत्रांच्या साक्षांकित नकला उपलब्ध करून दिल्या जातात.

**<u>नकलेकरीता आकारले जाणारे शुल्क</u>**

1) साध्या दराने प्रती पान रूपये 4/–
2) तात्काळ दराने प्रती पान रूपये 7/–

पक्षकाराने नकलेची रक्कम तात्काळ दराने भरल्यानंतर त्यांना 48 तासांमध्ये व साध्या दराने अर्ज असल्यास त्यांना 10 दिवसांमध्ये (कार्यालयीन सुट्टीचे दिवस वगळता) नक्कल उपलब्ध करून देण्यात येते.

➢ **<u>ई–सेवा केंद्र :–</u>**

जिल्हा न्यायालयामध्ये न्यायालयीन कामकाजाबाबत सर्व सुविधा एकाच कक्षामध्ये उपलब्ध व्हाव्यात या उद्देशाने जिल्हा न्यायालय, दिवाणी न्यायालय, व.स्तर व मुख्य न्यायदंडाधिकारी न्यायालय या सर्वांचे एकत्रित ई–सुविधा केंद्राची स्थापना करण्यात आलेली आहे. उस्मानाबाद मुख्यालयी 2 व प्रत्येक तालुका न्यायालयाकरीता 1 अशी किऑस्क मशिन पक्षकार/विधीज्ञ यांचे सेवेकरीता वापरात आहेत.

➢ तसेच जिल्हा न्यायालय व त्या अंतर्गत असलेल्या तालुका न्यायालयांचे न्यायनिवाडे देखील संगणक प्रणालीमध्ये भरले जावून ते इंटरनेटवर पक्षकार, वकील किंवा संबंधितास http://court.mah.nic.in and ecourts.gov.in/osmanabad या संकेत स्थळावर पाहता येवू शकतात. तसेच जिल्हा व तालुका न्यायालयांतर्गत ज्या प्रकरणांचा न्यायनिवाडा झालेला आहे अशा प्रकरणांचा न्यायनिर्णय सुध्दा संगणक प्रणालीमध्ये पी.डी.एफ. स्वरूपात संगणकीय प्रणालीवर पाहता येवू शकतात. संकेतस्थळावर प्रकरण कमांकानुसार जर प्रकरणाची माहिती, न्यायनिवाडा तसेच इतर माहिती घ्यावयाची असल्यास त्यासाठी प्रकरण कमांक, वर्ष, पक्षकारांचे नाव, विधीज्ञांचे नाव इ. वरुन शोधता येते आणि न्यायनिवाडे, न्यायाधीशांचे नावावरूनही शोधता येतात. जिल्हा न्यायालय, उस्मानाबाद येथे ई–सेवा केंद्राची स्थापना करण्यात आलेली असुन कंत्राटी तत्वावर लिपीक संवर्गातील 1 उमेदवारांची ठोक मानधनावर नेमणूक करण्यात आलेली आहे. ई–सेवा केंद्रामार्फत व्हिडीओ कॉन्फरन्सींग, स्कॅनींग, ई–फायलींग, ई–चलन भरणे इ. सुविधा पक्षकार आणि विधीज्ञ यांचेकरीता पुरविण्यात येतात.

> ➢ **<u>व्हीडिओ कॉन्फरन्सींग युनिट :</u>**

मा.उच्च न्यायालयाने उस्मानाबाद जिल्हा न्यायालयाचे ठिकाणी व्हीडिओ कॉन्फरन्सींग युनिट पुरविलेले आहेत. जेणेकरून न्यायाधीशांना जेलमध्ये असलेल्या आरोपींची जबानी ही त्याद्वारे घेता येईल. सन 2015–2016 मध्ये 2 युनिट जिल्हा न्यायालयास प्राप्त झालेले असुन ते सद्य स्थितीत वापरात आहेत.

तसेच शासनाकडून सन 2015–2016 मध्ये मुख्य न्यायदंडाधिकारी, उस्मानाबाद यांचे न्यायालय, जिल्हा न्यायालय–1,भूम, जिल्हा न्यायालय–1, उमरगा तसेच तुळजापूर, लोहारा, वाशी, भूम आणि परंडा या तालुका न्यायालयांसाठी व्हीडिओ कॉन्फरन्सींग युनीट प्राप्त झाले आहेत व ते जिल्हा कारागृहाशी वेबद्वारे जोडले आहेत. वेब बेस युजर द्वारे व्हीडीओ कॉन्फरन्सींग चालू आहे. त्याची नोंद नोंदवहीत प्रत्येक ठिकाणी घेण्यात येते.

**<u>कार्यालयाने दिलेल्या सवलती, परवाने किंवा प्राधिकार पत्रे मिळणा–यांचा तपशिल.</u>**

जिल्हा व सत्र न्यायालय, उस्मानाबादकडून दिवाणी मार्गदर्शीका चॅप्टर 32, परिच्छेद 634 नूसार खाली नमूद केल्याप्रमाणे उस्मानाबाद येथील स्थानिक व तालुका स्तरावरील न्यायालयामध्ये व<u>कीलांचे कारकुन</u> म्हणून काम करण्याचे परवाने देण्यात येतात.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| उस्मानाबाद | : | 1 | उमरगा | : | 3 |
| तुळजापूर | : | 5 | कळंब | : | 5 |
| भूम | : | 7 | परंडा | : | 2 |
| वाशी | : | 1 | लोहारा | : | –– |

जिल्हा व सत्र न्यायालय, उस्मानाबादकडून दिवाणी मार्गदर्शीका चॅप्टर 32, परिच्छेद 635 नूसार खाली नमूद केल्याप्रमाणे उस्मानाबाद येथील स्थानिक व तालुका स्तरावरील न्यायालयाचे आवारात पिटीशन रायटर/ <u>टंकलेखनाचे</u> काम करण्याचे परवाने संबंधित अर्जदारांना आज अखेर दिलेले आहेत.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| उस्मानाबाद | : | –– | उमरगा | : | –– |
| तुळजापूर | : | –– | कळंब | : | 1 |
| भूम | : | 1 | परंडा | : | 2 |
| वाशी | : | –– | लोहारा | : | –– |

जिल्हा व सत्र न्यायालय, उस्मानाबादकडून दिवाणी मार्गदर्शीका चॅप्टर 31, परिच्छेद 626 नूसार खाली नमूद केल्याप्रमाणे उस्मानाबाद येथील स्थानिक व तालुका स्तरावरील न्यायालयामध्ये <u>पिटीशन रायटर</u> म्हणून काम करण्याचे परवाने संबंधित अर्जदारांना आज अखेर दिलेले आहेत.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| उस्मानाबाद | : | –– | उमरगा | : | –– |
| तुळजापूर | : | –– | कळंब | : | –– |
| भूम | : | –– | परंडा | : | –– |
| वाशी | : | –– | लोहारा | : | –– |

जिल्हा व सत्र न्यायालय, उस्मानाबादकडून दिवाणी मार्गदर्शीका चॅप्टर 31, परिच्छेद 626 नूसार खाली नमूद केल्याप्रमाणे उस्मानाबाद येथील स्थानिक व तालुका स्तरावरील न्यायालयामध्ये स्टॅम्प विक्रीचे काम करण्याचे परवाने संबंधित अर्जदारांना दिलेले आहेत.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| उस्मानाबाद | : | 2 | उमरगा | : | — |
| तुळजापूर | : | — | कळंब | : | — |
| भूम | : | 1 | परंडा | : | 1 |
| लोहारा | : | — | | | |

- **उपहारगृहे :–** पक्षकारांसाठी/विधाज्ञांसाठी, उस्मानाबाद जिल्हा न्यायालयाचे आवारामध्ये एकूण 2 ठिकाणी उपहारगृहे कार्यरत आहेत.

- **प्रसाधन गृहे :–**
  - अ. उस्मानाबाद जिल्हा न्यायालयीन इमारतीच्या बाहय आवारामध्ये पक्षकार, विधीज्ञ यांचेकरीता पुरेशा ठिकाणी महिला व पुरूषांकरीता स्वतंत्र प्रसाधन गृहे उपलब्ध आहेत.
  - ब. उस्मानाबाद जिल्हा न्यायालय आवारामध्ये असलेल्या विविध इमारती अंतर्गत पक्षकार, विधीज्ञ, न्यायालयीन कर्मचारी यांचेकरीता पुरेशा ठिकाणी महिला व पुरूषांकरीता स्वतंत्र प्रसाधन गृहे उपलब्ध आहेत.

- **पिण्याच्या पाण्याची सोय :–**
  उस्मानाबाद जिल्हा न्यायालय आवारामध्ये सर्वांकरीता ठिक–ठिकाणी पिण्याच्या पाण्याची सोय करण्यात आलेली आहे.

- **तकारपेटी :–**
  उस्मानाबाद जिल्हा न्यायालय व त्या अंतर्गत कार्यरत असणाऱ्या सर्व प्रमुख आस्थापनांचे कार्यालयामध्ये तकारपेटी ठेवण्यात आलेल्या आहेत. ज्यामध्ये एखाद्या पक्षकाराला/ विधीज्ञांना न्यायालयीन/कार्यालयीन कामकाजाचे अनुषंगाने काही तकार करावयाची असेल, तर ते त्यांची तकार सदर तकार पेटीमध्ये टाकू शकतात.

- **प्रथमोपचार साहित्यपेटी :–**
  उस्मानाबाद जिल्हा न्यायालय येथे नाझर कार्यालय तसेच जिल्हांतर्गत असणाऱ्या सर्व आस्थापनामध्ये प्रथमोपचार साहित्यपेटी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

- **अग्निशामक यंत्र :–**
  उस्मानाबाद जिल्हा न्यायालयाचे अंतर्गत येणाऱ्या सर्व इमारतींमध्ये अग्निशामक यंत्रांची उपलब्धता करुन देण्यात आलेली आहे.

K.R.Pethkar

दिनांक : 10 फेब्रुवारी, 2022

( के.आर.पेठकर )
प्रमुख जिल्हा न्यायाधीश,उस्मानाबाद

• • •